ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

*" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ पुणें, बुधवार तारीख २४ ऑगस्ट, १९५५ अंक ३४

## विविध माहिती

**लंडनमध्यें हिंदूंचें देऊळ**—लंडन शहरांत हिंदूंसाठी एक देऊळ आणि प्रार्थनेचा सभामंडप बांधण्याची विनंति हिंदुमहासभेच्या अध्यक्षांनीं केली आहे. लंडनमधील मोकळ्या जागांच्या किंमती लक्षांत घेतां जागा व इमारत ह्या दोन्हींसाठी मिळून ४ लाख रुपये लागतील. १००० माणसें मावतील, येवढें प्रार्थनागृह बांधण्याचा विचार आहे.

**शास्त्रें शिकविणारे शिक्षक**—अणुयुगाला प्रारंभ झाल्यामुळें सर्व जगांतील दुय्यम शिक्षणाच्या शाळांतून शास्त्रें शिकविणाऱ्या शिक्षकांची मागणी वाढेल, असा अंदाज संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या शिक्षणशाखेनें केला आहे. अविकसित देशांतून शास्त्रीय विषयांच्या शिक्षणाचा प्रसार करण्याचा प्रयत्नहि शाखा करणार आहे.

**अवमूल्यनाचा परिणाम**—पाकिस्तानच्या रुपयाची किंमत कमी करण्यांत आल्यामुळें तेथील अन्न-धान्याच्या व देशांतच उत्पन्न झालेल्या कापडाच्या किंमतींत फारसा फरक पडलेला नाहीं. पण औषधांच्या किंमती मात्र लक्षांत येण्याइतक्या चढल्या आहेत असें समजतें.

**औषधांचा कारखाना**—ओरिसा सरकारनें देशी औषधें तयार करण्याचा स्वतःच्या मालकीचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ओरिसांत सांपडणाऱ्या वनौषधींचा उपयोग करून देशी पद्धतीचीं औषधें तयार करण्यांत येणार आहेत.

**भारतीय संगीताचीं वाद्यें**—भारतीय संगीताला लागणारीं वाद्यें तयार करण्याचें शिक्षण देण्याचें केंद्र, अखिल भारतीय हस्तव्यवसाय बोर्डातर्फे मद्रास येथें स्थापन करण्यांत येणार आहे. बोर्डाच्या कार्यकारी समितीनें ह्या पद्धतीची एक प्रयोगिक योजना मंजूर केली आहे. केंद्रांतील कामकाज मद्रासमधील एका प्रमुख संगीतज्ञाच्या सल्ल्यानें चालणार आहे.

**सिंदीया बोट कंपनीला कर्ज**—मध्यवर्ती सरकारनें सिंदीया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीला दोन नव्या बोटी विकत घेण्यासाठी २·२१ कोटी रुपये कर्ज देण्याचें ठरविलें आहे. कंपनीसाठी परदेशीय गोद्यांतून दोन बोटी बांधण्यांत येत आहेत. कर्जावर २३ टक्के व्याज आकारण्यांत येणार असून तें १२ वर्षांत फेडावयाचें आहे.

**राजस्थान सरकारची मागणी**—राज्यांतील वाहतुकीच्या रस्त्यांची वाढ करण्यासाठी राजस्थान सरकारनें नियोजन-समितीकडे २० कोटी रुपयांची मागणी केली आहे. वाहतूक आणि दळणवळणाचीं साधनें ह्या बाबतींत राजस्थानचें राज्य इतर राज्यांच्या मानानें अधिक मागासलेलें आहे.

**परिषदांसाठी नवी इमारत**—दिल्लींत भरणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांसाठी नवी इमारत बांधण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. इमारत किंग एडवर्ड रस्त्यावर बांधण्यांत येणार असून तीसाठी २७ लाख रुपये खर्च येईल. त्याशिवाय फर्निचर व सुखद् हवामान राखण्याची यंत्रसामुग्री ह्या बाबींवर वेगळा खर्च होईल.

**बँकेला परवाना नाकारला**—कलकत्ता येथील ब्रिटिश इंडिआ बँकिंग कॉर्पोरेशन लि. ह्या भारतीय बँकेला बँकिंगचा व्यवसाय करण्याचा परवाना देण्याचें रिझर्व्ह बँकेनें नाकारलें आहे. परवाना नाकारल्यामुळें बँकेला हा व्यवसाय करतां येणार नाहीं आणि परिणामतः लोकांकडून ठेवी घेतां येणार नाहींत.

**भिलई येथील पोलादाचा कारखाना**—भिलई येथें उभारण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याला १५० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. कारखाना चालू झाल्यावर सुमारें ५ लाख लोकांना रोजगार मिळेल. खुद्द कारखान्यांत ५,००० लोकांना काम मिळेल. उत्पादनासाठी जरूर असलेल्या ५०० तंत्रज्ञांपैकीं ३०० रशिअन तंत्रज्ञ असतील.

**अमेरिकन कापसाची निर्यात**—अमेरिकेच्या शेतकी खात्यानें आंखूड धाग्याच्या कापसाच्या आपल्याजवळील सांठ्यापैकीं कांहीं कापूस खुल्या बाजारांत विकण्याचें ठरविलें आहे. कापसाच्या किंमती कमी ठेवण्यासाठी सरकारी आर्थिक मदत देण्यांत येईल किंवा काय, ह्याचा मात्र खुलासा करण्यांत आलेला नाहीं.

**स्पेन-जपान व्यापारी करार**—स्पेन व जपान ह्या राष्ट्रांत व्यापारी करार करण्यांत आला आहे. जपान स्पेनला यंत्रसामुग्री, रसायनें, इत्यादि माल देणार असून स्पेनकडून बराच तांदूळ आयात करणार आहे. जपानमधील वाढत्या लोकसंख्येला लागणारा तांदूळ देशांत पिकत नसल्यामुळें जपानला तांदूळ मिळेल तेथून आयात करावा लागतो.

**भारताच्या कोळशाच्या खाणी**—भारतामधील कोळशाच्या खाणींचें ३० वर्षेपर्यंत तरी राष्ट्रीयीकरण करण्यांत येऊं नये अशी मागणी करण्यांत येत आहे. परंतु, सरकार ही मागणी मान्य करण्याचा संभव नाहीं, असें समजतें. तथापि दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेंतच त्यांचें राष्ट्रीयीकरण होईल असाहि संभव नाहीं.

**रशिआच्या लष्करांत कपात**—चालू वर्षअखेर रशिआनें आपल्या खड्या सैन्यापैकीं ६,४०,००० लष्करी लोकांना सेवा-मुक्त करण्याचें ठरविलें आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या अंदाजाप्रमाणें रशिआच्या लष्करांत ४३ लाख लोक असावेत. त्यापैकीं २८ लाख भूदलांत, ८ लाख विमानदलांत आणि ७ लाख नौदलांत असावेत.

### डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा ७० वा वाढदिवस

डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि फर्ग्युसन कॉलेज, पुणें यांच्या स्थापनेला चालू वर्षी ७० वर्षें पूर्ण झालीं. हा ७० वा वाढदिवस या वर्षी डिसेंबर १९५५ च्या तिसऱ्या आठवड्यांत मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचें चालकांनीं योजिलें आहे. समारंभाची निश्चित योजना मागाहून जाहीर होईल. तथापि माजी विद्यार्थ्यांचें संमेलन, करमणुकीचे कार्यक्रम, नियोजित अध्यक्षांचें भाषण, इत्यादिकांचा समावेश कार्यक्रमांत केला जाईल.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संस्था आणि फर्ग्युसन कॉलेज यांतील माजी विद्यार्थी सर्वत्र विखुरलेले आहेत. त्या सर्वांचे सध्यांचे पत्ते चालकांना माहीत असण्याचा संभव कमी. तेव्हां सर्व माजी विद्यार्थ्यांना चालकांची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं माजी विद्यार्थ्यांनीं भरून पाठवावयाचे फॉर्म प्रिन्सिपॉल फर्ग्युसन कॉलेज, पुणें नंबर ४ अगर सोसायटीची इतर कोणतीहि संस्था यांच्याकडून मागवून ते भरून पाठवावेत. म्हणजे माजी विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यावर समारंभाचीं निमंत्रणें पाठविणें चालकांना सोयीचें पडेल. तसेंच समारंभाबद्दल कांहीं सूचना केल्यास त्यांचाहि विचार आस्थापूर्वक केला जाईल. समारंभ यशस्वी करण्यास डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सर्व संस्थांचे आणि प्रामुख्यानें फर्ग्युसन कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे हितचिंतक सहकार्य देतील, अशी आशा आहे.

---

### पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील ट्यूब वेल्स

भारताच्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ४,००० ट्यूब वेल्स खणण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. इतक्या विहिरी खोदणेंहि जरासें अवघड काम होतें. पण ठरल्यापेक्षा १,६०० विहिरी अधिकच खोदण्यांत येतील असें दिसत आहे. पहिली योजना पूर्ण होईपर्यंत ह्या कामावर सुमारें ३३ कोटी रुपये खर्च झालेले असतील. विहिरींतून निघूं शकणाऱ्या पाण्यानें २५ लाख एकर जमिनीला पाण्याचा निश्चित पुरवठा होऊं लागेल. पाण्याच्या पुरवठ्याचा दर १५,००० गॅलन्सला १ रुपया असा ठेवण्यांत आला आहे. कालव्याचें पाणी घेण्यापेक्षा ट्यूबवेल्समधील पाणी घेणें महाग पडतें. तथापि, पाण्याची ही किंमत शेतकऱ्याला परवडेल अशीच आहे. ह्याच दरानें पाणी देण्यांत आल्यास ट्यूबवेल्स आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होतील.ह्या बाबतींत आतां अशी एक सूचना करण्यांत येत आहे, कीं कालव्याचें पाणी व ट्यूबवेल्सचें पाणी ह्यांच्या दराचा एकत्र विचार करून दोन्हींचें पाणी सारख्या दरानें देण्यांत यावें. असें करण्यांत आल्यास पाण्याच्या दरांतील फरक बऱ्याच प्रमाणांत कमी होईल. ट्यूब वेल्समधील पाणी जमिनींत बऱ्याच खोलीवर असतें. त्यामुळें पाण्याचा पुरवठा नेहमीं होण्यासारखा असतो; आणि म्हणूनच दुष्काळाविरुद्ध हें पाणी म्हणजे एक प्रकारची हमीच आहे. उत्तर प्रदेशांत २,६०० ट्यूब वेल्स व मुंबई राज्यांत ४०० ट्यूब वेल्स खणण्यांत आल्या आहेत. बाकीच्या विहिरी पंजाब, बिहार आणि पेप्सु ह्या राज्यांत आहेत.

---

**पेप्सूंत एंजिनिअरिंग कॉलेज**—पेप्सु राज्यांत खुद्द पतिआळा ह्या शहरीं अगर त्याच्या नजीक नवें एंजिनिअरिंग कॉलेज लवकरच काढण्यांत येणार आहे. कॉलेज काढण्याच्या कामीं राज्य-सरकार आणि श्री. करमचंद कपूर हे उद्योगपति सहकार्य करणार आहेत. श्री. करमचंद १० लाख रुपये देणार असून राज्य सरकारहि तितकीच रक्कम देणार आहे.

## पुणें बँकिंग असोसिएशनची वार्षिक सभा

### आर्थिक परिषदेस १०० रु. ची देणगी

पुणें बँकिंग असोसिएशनची वार्षिक सभा ता. १२ ऑगस्ट १९५५रोजीं सायंकाळीं ६ वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे दिवाणखान्यांत भरली होती. त्यावेळीं मागील वर्षाचा ताळेबंद मंजूर करणेंत येऊन पुढील सालाकरितां खालील पदाधिकाऱ्यांची निवडणूक झाली:—

**कार्यकारी मंडळ :** ( १ ) श्री. सी. व्ही. जोग ( बँक ऑफ महाराष्ट्र ), ( २ ) श्री. के. बा. मुजुमदार ( देवकरण नानजी बँकिंग कं. ) ( ३ ) श्री. डी. एन्. गांडेकर ( न्यू सिटिझन बँक ).

**ऑनररी सेक्रेटरी :** श्री. डी. एन्. गांडेकर ( न्यू सिटिझन बँक ).

**ऑनररी हिशेबतपासणीस :** श्री. एन्. एन्. क्षीरसागर ( भारत इं. बँक )

पुढील वर्षी प्रसिद्ध होणाऱ्या बँकिंगविषयक प्रकाशनाकरितां खालील सभासदांची सल्लागार समिति नेमण्यांत आली:—( १ ) श्री. आर. वी. साळवेकर ( २ ) श्री. बी. जे. त्रिलोकेकर ( ३ ) श्री. डब्ल्यु. जी. आळतेकर ( ४ ) श्री. जी. डी. जोगळेकर ( ५ ) श्री. डी. एस्. जमदग्नि ( ६ ) श्री. सन्ना.

पुणें येथें भरणाऱ्या, हिंदी आर्थिक परिषदेच्या अधिवेशनास १०० रुपयांची देणगी देण्याचें ठरलें.

पुढील वर्षातील सहली, व्याख्यानें, बँकिंगविषयक प्रकाशनें इत्यादिबाबत विचारविनिमय झाला.

---

### आय. ए. एस. उमेदवारांची राज्यवार संख्या

इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस, इत्यादि परीक्षांना १९५४–५५ मध्यें एकूण २,३७८ उमेदवार बसले होते. त्यांची राज्यवार वांटणी अशी होती:—आंध्र १०४, आसाम १६, बिहार १५१, मुंबई १५४, मध्यप्रदेश ५१, मद्रास ४०१, ओरिसा ५४, पंजाब २५२, उत्तर प्रदेश ६००, प. बंगाल १३१, हैद्राबाद १३, मध्यभारत १२, म्हैसूर २७, पेप्सु ३२, राजस्थान ४२, सौराष्ट्र १०, त्रावणकोर–कोचीन ७७, अजमीर ९, कूर्ग १, दिल्ली २३४, हिमाचल प्रदेश ५, आणि विंध्य-प्रदेश २. ह्या आंकड्यांवरून दिसून येतें, कीं उमेदवारांत मद्रास, पंजाब, उत्तर प्रदेश व दिल्ली येथील विद्यार्थ्यांचा भरणा मोठा आहे; मुंबई राज्यांतील त्यामानानें फारच थोडे विद्यार्थी ह्या परीक्षांस बसतात. मुंबई राज्यांत मुंबई शहर, गुजरात, कर्नाटक व महाराष्ट्र ह्यांचा समावेश होतो हें लक्षांत घेतलें, म्हणजे एकूण उमेदवारांत महाराष्ट्रीय उमेदवार किती कमी आहेत हें स्पष्ट होईल. अशा परिस्थितींत, उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांतहि महाराष्ट्रीयांची संख्या कमी आढळली, तर नवल नाहीं.

---

### युनायटेड नेशन्सचा खर्च

'दि युनायटेड नेशन्स' चा येत्या वर्षाचा अंदाजी खर्च ४,६२,७८,००० डॉलर्स एवढा आहे. युनायटेड नेशन्सच्या ३,८९६ नोकरांपैकी १६० नोकर चालू वर्षी कमी केले; येत्या वर्षी आणखी ११२ नोकर कमी केले जातील. युनायटेड नेशन्सच्या खर्चांत दरसाल अधिकाधिक काटकसर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २४ ऑगस्ट, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआची शास्त्रीय प्रगति

अमेरिकेंतील एअर फोर्स असोसिएशनच्या बैठकीपुढें डॉ. गायफोर्ड स्टेव्हर ह्यांनीं रशिआच्या शास्त्रीय प्रगतिबद्दल कांहीं माहिती सांगितली. डॉ. स्टेव्हर हे अमेरिकेच्या हवाई दलाचे मुख्य शास्त्रज्ञ आहेत. ते म्हणाले, कीं रशिआची शास्त्रीय प्रगति आणि कुवत पाहून अमेरिकेला आश्चर्याचा धक्का बसला आहे. रशिअन शास्त्रज्ञांचा मगदूर अमेरिकेनें कमी लेखूं नये अगर त्याकडे दुर्लक्षहि करूं नये. अशा प्रकारचा अनादर दाखविण्यांत आला तर तो अखेर अमेरिकेलाच घातक ठरणार आहे. सध्यां अमेरिका आणि रशिआ ह्यांच्यांत एक प्रकारची तंत्रस्पर्धाच चालू आहे. ह्या स्पर्धेत रशिआला एक बाब फारच अनुकूल आहे. ती म्हणजे शास्त्रीय शिक्षणावर आणि प्रगतीवर रशिआंत देण्यांत येणारा भर. शिवाय, रशिआला लाभलेल्या शास्त्रीय ज्ञानाचा वारसाहि बळकट आहे. शास्त्राच्या पुष्कळ शाखा अशा आहेत कीं त्यांत रशिअन शास्त्रज्ञ जगांतील शास्त्रज्ञांच्या आघाडीवर आहेत. नवीन एंजिनिअर्स शिकवून तयार करण्याच्या बाबतींत अमेरिका आजच रशिआपेक्षा मागें आहे. ह्या चढाओढींत तरी अमेरिकेचा पराभव झालेला आहे. १९५० पासून अमेरिकेंत नवीन एंजिनिअर्सच्या संख्येंत घट होत आहे. सध्या दरवर्षी अवघे २०,००० एंजिनिअर्स अमेरिकेंत पदवी घेतात. ह्याच्या उलट परिस्थिति रशिआंत आहे. १९५० सालीं रशिआंत २८,००० नवे इंजिनिअर्स शिकून तयार झाले. त्यांच्या संख्येंत दरवर्षी वाढ होतां होतां १९५५ सालीं रशिआंत ५४,००० एंजिनिअर्स तयार होतील.

---

## कापडाच्या उत्पादनाबद्दल सरकारला इषारा

अहमदाबाद येथील हॅरोल्ड लास्की इन्स्टिट्यूटमध्यें फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संस्थेचे अध्यक्ष श्री. शांतिलाल मंगळदास ह्यांचें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेवर व्याख्यान झालें. ते म्हणाले कीं, मध्यवर्ती सरकारनें कापडाच्या गिरण्यांत होणाऱ्या उत्पादनावर मर्यादा घालण्याचें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ठरविलें आहे. अशा प्रकारची मर्यादा घातल्यामुळें योजनेच्या काळांत गिरण्यांत तयार झालेल्या कापडाच्या किंमती वाढल्याशिवाय राहणार नाहींत. हातमागावर अगर यंत्रमागावर तयार करण्यांत आलेल्या कापडाच्या किंमती गिरण्यांतून तयार होणाऱ्या कापडापेक्षा तुलनेनें अधिकच असणार. सध्यां गिरण्यांतून तयार होणारें कापड सुमारें ५०० कोटी वारांच्या जवळपास आहे. हातमाग व यंत्रमाग ह्यांचें उत्पादन सुमारें १५० कोटी ते ३०० कोटी वार आहे. गिरण्यांच्या उत्पादनावर मर्यादा घातल्यावर त्या उत्पादनापेक्षा जी अधिक मागणी असेल ती हातमागाच्या व यंत्रमागाच्या कापडानें भागविण्याचा सरकारचा विचार आहे. सरकारच्या धोरणामुळें कापड-गिरण्यांच्या कापडाच्या किंमती वाढतील आणि त्यामुळें कापडाचा खप घटेल. कापडाचा खपच घटला म्हणजे हातमागाच्या धंद्यालाहि धक्का बसल्याशिवाय राहणार नाहीं. अर्थातच, सरकारला एका नव्याच प्रश्नाला तोंड द्यावें लागेल. हातमागाच्या धंद्यांत काम करणाऱ्या लाखों कामगारांना कापडाचा खप घटल्यामुळें बेकार व्हावें लागेल, आणि त्यांना काम पुरविण्याची जबाबदारी सरकारवर पडेल.

---

## ब्रिटनमधील पोलादाचें उत्पादन

ब्रिटनच्या आयर्न अँड स्टील बोर्डानें प्रसिद्ध केलेल्या माहितीप्रमाणें चालू वर्षाच्या पहिल्या ३० आठवड्यांत ब्रिटनमध्यें १,१३,००,००० टन लोखंडाचें व पोलादाचें उत्पादन करण्यांत आलें. १९५४ च्या ह्याच काळांतील उत्पादनाचा विचार करतां उत्पादनांत ६.९ टक्के वाढ झाल्याचें दिसून येतें. उत्पादनांत वाढ झालेली असली तरी ह्या धातूंचा उपयोग करणाऱ्या कारखान्यांची गरज आणि निर्यातीची गरज ह्या दोन्ही त्यामुळें भागूं शकत नाहींत. कारण, मागणी वाढलेली आहे. बहुतेक पोलादाच्या कारखान्यांतून वर्षअखेर पुरतील इतक्या मागण्या नोंदण्यांत आल्या आहेत. पोलादाचे कारखानदार गेल्या वर्षापेक्षा थोडेसें अधिक पोलाद निर्यात करीत असले तरी स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी ब्रिटनला पोलादाची आयात करावी लागत आहे. गेल्या ७ महिन्यांत ब्रिटनमधील पोलादाची मागणी १० टक्क्यांनीं वाढली आहे. उत्पादनांत मात्र ७ टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. गरज व उत्पादन ह्यांच्यांत असलेली तफावत आयात करून भागविली जात आहे. १९५५ सालीं ब्रिटनला १६,००,००० टन पोलाद आयात करावें लागेल असा अंदाज आहे. १९५४ सालच्या मानानें ही आयात तिप्पट आहे. आयात केलेल्या पोलादाची किंमत देशांतच तयार झालेल्या पोलादापेक्षा १५ टक्क्यांनीं अधिक असते. त्यामुळें ब्रिटनला आयातीसाठी द्याव्या लागणाऱ्या रकमेंत १५,००,००,००० पौंडांची भर पडेल. त्याशिवाय, परदेशांतून आलेल्या मागण्या पुऱ्या करतां न आल्यामुळें ब्रिटनच्या पोलादाच्या धंद्याचें नुकसान होईल, तें निराळेंच.

---

## कानपूर येथील संपानें केलेलें नुकसान

कानपूर येथील गिरण्यांमध्यें २ मे रोजीं संपास प्रारंभ झाला व तो संप ८० दिवस टिकला. ह्या मुदतींत कामगार, मालक व सरकार ह्यांचें मिळून ७ कोटी रुपयांचें नुकसान झालें. कानपूरमधील गिरण्या दररोज सुमारें ५ लक्ष रु. किंमतीचें कापड तयार करतात व ५०,००० रु. एक्साइज कर भरतात. गिरण्या दरसाल ३ कोटी रुपये इन्कमटॅक्स देतात. कानपूर येथील सरकारी मालकीच्या वीज कंपनीचें कित्येक लक्ष रुपयांचें नुकसान झालें आहे. हजारो गिरणी मालकांच्या बेकारीमुळें कानपुरांतील सर्वसामान्य व्यापारावरहि प्रतिकूल परिणाम झाला आहे.

## बँकिंग व चेकविषयक महत्त्वाचा निवाडा

### बँकेवरील जबाबदारीचें स्वरूप

बँकिंगच्या कायद्याच्या दृष्टीनें एक महत्त्वाचा निवाडा मुंबई हायकोर्टानें केला आहे. बाँबे मर्कंटाइल बँक लि. नें न्या. तेंडोलकर ह्यांच्या निवाड्यावर केलेल्या अपिलाचा विचार मुख्य न्यायाधीश न्या. छगला व न्या. देसाई ह्यांनीं करून, न्या. तेंडोलकरांचा निवाडा फिरवला आहे.

### हकीकत

१५ मे, १९४५ रोजीं दि ऑरिऑल इंडस्ट्रीज लि. ची स्थापना होऊन मेसर्स पोद्दार चको आणि कं. ला मॅनेजिंग एजंट्स नेमण्यांत आलें. २१ मे रोजीं कंपनीनें ठराव करून बाँबे मर्कंटाइल बँकेंत खातें उघडलें व कंपनीच्यातर्फे बँकेवर काढलेले चेक पास करण्याचा बँकेस अधिकार दिला.

त्यानंतर मॅनेजिंग एजंटांनीं एकूण २८ चेक बँकेवर काढले. त्यांपैकी एक चेक २०,००० रु. चा होता व बाकीच्या सर्व चेक्सची मिळून रक्कम ८,८८२ रु. १३ आ. झाली. बँकेनें हे सर्व चेक पास केले. कंपनीच्या नांवानें बँकेंत खातें उघडण्यांत आलें, तेव्हां मॅनेजिंग एजंट्स्, श्री. पोद्दार व श्री. चको ह्यांच्या नमुन्याच्या सह्या बँकेनें घेतल्या होत्या; कारण तेच खातें चालविणार होते. बँकेनें कंपनीकडे २ चेकबुकें धाडलीं, त्या चेकबुकांतील चेक्सचा उपयोग करूनच सर्वच्या सर्व २८ चेक्स काढले होते, ह्या गोष्टीबद्दल दुमत नव्हतें. तथापि ह्या चेक्सवर कंपनीचें नांव लिहिण्यांत आलें नव्हतें किंवा हे चेक कंपनीनें किंवा तिच्या वतीनें काढण्यांत आले असल्याचें कांहींहि निदर्शक त्यांवर नव्हतें.

### न्या. तेंडोलकरांचा निवाडा

बँकेनें हे सर्व चेक चुकीनें पास केले व त्यामुळें कंपनीचें २८,८८२ रु. १३ आ. नुकसान झालें, ह्या कारणास्तव बँकेकडून त्याची वसुली करण्यासाठी कंपनीनें बँकेवर दावा लावला. २०,००० रु. च्या चेकबाबत २०,००० चा हुकूमनामा न्या. तेंडोलकरांनीं कंपनीस दिला. कंपनीनें किंवा तिच्या वतीनें चेक काढला असल्याचें ज्या चेकवर दिसून येत नाहीं, त्या चेकबद्दल कंपनीवर जबाबदारी नाहीं, असें त्यांचें मत पडलें.

### अपिलांत निवाडा फिरविला

बँकेनें त्यावर अपील केलें. त्याचा निवाडा करतांना, न्यायमूर्तीद्वय म्हणाले कीं, एकाद्या विशिष्ट खात्याबाबतच चेक आहेत, अशी जे चेक काढतात व जे ते सद्भावनेनें पास करतात, त्यांची खात्री असली म्हणजे त्या चेकवर विशिष्ट खात्याचा उल्लेख नाहीं ही सबब पुढें करतां येणार नाहीं, असा हाऊस ऑफ लॉर्डस्चा निवाडा आहे. ( Mahony v. East Holyford Mining Company 1875 ) हा निवाडा अद्याप बंधनकारक आहे. बँक सद्भावनेनें वागली असेल व एका विशिष्ट खात्यावरचाच चेक असल्याबद्दल चेक काढणाराची व चेक पास करणाऱ्या बँकेची भावना असेल, तर बँकेच्या पास करण्याच्या कृत्यास कायद्याचें संरक्षण मिळेल. एखादी विशिष्ट, मामुली गोष्ट ( formality ) चेकच्या बाबतींत पाळली गेली नाहीं, तर त्याबद्दल बँकेस जिम्मेदार धरतां येणार नाहीं. हाउस ऑफ लॉर्डस्नें त्याच्या उपरिनिर्दिष्ट निवाड्यांत नमूद केलेल्या सर्व अटी प्रस्तुत प्रकरणांत पाळल्या गेलेल्या आहेत. बँकेनें सद्भावनेनें २८ चेक पास केले आहेत; बँकेमधील कंपनीच्या खात्यावर ते काढलेले आहेत व ते काढण्यास काढणारांना कंपनीनें योग्य ते अधिकार दिलेले आहेत, अशी बँकेनें स्वतःची इमानदारीनें खात्री करून घेतलेली आहे. म्हणून, बँकेवर जिम्मेदारी येत नाहीं. अपील मान्य करून दावा खर्चासुद्धां काढून टाकण्यांत येत आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
स्थापना १९१८
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,३६,०००
रिझर्व रु. ६,९३,०००
ठेवी रु. १,३७,००,०००
शाखा — दादर, माहीम, बेळगांव, पुणें.
★ हमाम स्ट्रीट येथें बँकेची फोर्ट शाखा २१ जूनपासून चालू झाली आहे. ★

### एका विद्यापीठाचा कुलगुरु दुसऱ्या विद्यापीठांत साधा विद्यार्थी

युवराज करणसिंग हे जम्मू आणि काश्मीरचे सरदार-इ-रियासत ह्या नात्यानें काश्मीर विद्यापीठाचे कुलगुरु आहेत. ह्या विद्यापीठांतून बाहेर पढणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्या देण्याचा त्यांना विशेषाधिकार आहे. तथापि, त्यांनीं एम्. ए. चा विद्यार्थी म्हणून दिल्ली विद्यापीठांत नांव दाखल केलें आहे. एप्रिल, १९५७ मध्यें ते ह्या परीक्षेस बसतील.

WILICO
कालाबरोबर प्रगतिपथावर असलेल्या वेस्टर्न इंडियाची विमा पॉलिसी
—म्हणजेच—
जीवनाची सुरक्षितता
★ १९५४ चे कांहीं बोलके आंकडे ★
एकूण नवीन काम .... रु. ४ कोटीवर
एकूण हप्त्याची आवक .... रु. १ कोटीवर
एकूण आयुर्निधि .... रु. ६ कोटीवर
एकूण क्लेम्स दिले .... रु. २॥ कोटीवर
—बोनस दरसाल दर हजारी—
रु. १२ व रु. १५
हयातींतील विमा हयातीनंतरचा विमा
वेस्टर्न इंडिया
विमा कंपनी लिमिटेड, सातारा.
पुणें शाखा :—वेस्टर्न इंडिया हाऊस, लक्ष्मी रस्ता, पुणें २.
—फोन नं. ३४०१—

## सहकारी कायद्याच्या ५४ व्या कलमाच्या व त्याबाबतच्या कानूंच्या दुरुस्तीची आवश्यकता

( लेखक : दत्तशर्मा )

श्री. " एक सहकारी " यांनीं मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्याच्या ५४ व्या कलमाच्या दुरुस्तीच्या आवश्यकतेसंबंधीं दिनांक १० ऑगस्ट १९५५ च्या " अर्थ " साप्ताहिकांत ( पृष्ठ २२५ पहा ) लेख लिहून या प्रश्नास तोंड फोडलें हें योग्यच झालें. ५४ वें कलम एवढेंच नव्हे, तर या बाबतच्या कानूंचीहि ( कानू ३२ ते ३६ पहा ) दुरुस्ती तातडतोब करण्याची आणखीहि कांहीं कारणें अलिकडे घडलीं आहेत. हीं कारणें सरकारच्या व जनतेच्या नजरेस आल्यास या दुरुस्त्या तातडतोब होणें कां जरूर आहे हें त्यांनाही पटेल असें आम्हांस वाटतें व म्हणून याबाबतचा थोडाफार तपशील व त्यासंबंधींचे आमचे विचार या लेखांत नमूद करण्याचें आम्हीं योजलें आहे.

सहकारी संस्था व तिचे आजी अगर माजी सभासद यांचे दरम्यानचा वाद कोणत्या पद्धतीनें सोडविला जाईल, तें कायद्याचें कलम ५४ मध्यें सांगितलें आहे; व या दाव्याचें काम कसकसें केलें जाईल तें कानू ३२ तें ३६ मध्यें सांगितलें आहे. वाचकांनीं हें कलम व हे कानू संपूर्णपणें वाचल्यास या लेखांतील विचारा-संबंधीं त्यांना आपापलीं मतें बनविण्यास सोयीचें होईल. तथापि सर्वच वाचकांना हें शक्य होईल असें आम्हांस वाटत नाहीं. सबब या लेखास उपयोगी पडेल एवढा या कलमांतील व कानूंतील भाग ( इंग्रजींत ) आम्ही या खालीं देत आहों.

कलम ५४ पैकीं जरूरीपुरता मजकूर:—" If any dispute touching the constitution or business of a society arises........between the society.........and any......... number......past or present, it shall be referred to the Registrar for decision by himself or his nominee or if either of the parties so desires, to arbitration of three arbitrators who shall be the Registrar or his nomince and two persons of whom one shall be nominated by each of the parties concerned......"

कानू ३२ पैकीं जरूरी पुरता मजकूर :—" When either of the parties desires that the matter be referred to arbitration the Registrar ( or his nominee ) shall call on each party to nominate its arbitrator within 15 days.......... When there are more persons than one on each side, the principal party on each side will have the right to nominate the arbitrator. In such cases the Registrar will decide who is the principal party and his decision shall be final.

कानू ३५ पैकीं जरूरी पुरता मजकूर :—" ...... In cases where three arbitrators are appointed, the opinion of the majority shall prevail. In case of equality of votes, it shall be decided by the Registrar himself."

वरील कलम व कानू यांत नमूद असलेल्या मजकुरावरून सामान्य वाचकाचें असें मत होईल कीं, असल्या प्रकारचे दावे ( १ ) रजिस्ट्रार, ( २ ) त्यांनीं नेमलेला इसम, अगर ( ३ ) तीन इसमांचें लवादबोर्ड यांचेंपुढें चालले पाहिजेत. रजिस्ट्रार अगर त्यांनीं नेमलेल्या इसमांपुढें चालणाऱ्या दाव्यांचा निकाल सदर अधिकारी अगर इसम हा आपल्या समजदारीप्रमाणें करील व त्याप्रमाणें निवाडा देईल; आणि तीन लवादांच्या बोर्डापुढें चालणाऱ्या दाव्याचा निकाल सदर मंडळांतील सभासदांच्या एकमतानें अगर बहुमतानें दिलेल्या निर्णयाप्रमाणें होईल व त्याप्रमाणें निवाडा दिला जाईल. लवादमंडळ फक्त तीन इसमांचेंच असेल; त्यापेक्षा अधिकांचें असणार नाहीं; व त्या तीन लवादांपैकी एक रजिस्ट्रार अगर त्यानें नेमलेला इसम हा असून, एक वादीपक्षातर्फे व एक प्रतिवादीपक्षातर्फे त्या त्या पक्षानें सुचविलेला, असे एकूण तीन लवाद असतील. परंतु सामान्य वाचकांना वाटणारा कलम ५४ चा हा अर्थ कायदेशीर आहे असें आतां म्हणतां येणार नाहीं. कारण, याबाबत बॉम्बे को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनलनें नुकतांच एक निकाल जाहीर केला असून तोच यापुढें मान्य करणें भाग आहे. ह्या निकालासंबंधीं आम्हांस कांहींहि म्हणावयाचें नाहीं. कारण, कायद्याचा अर्थ लावण्याचा अधिकार या न्यायदानमंडळाचा आहे असें आम्ही धरून चालतों. त्या मंडळानें दिलेल्या निकालावरून असें दिसतें कीं, वादी पक्षांत आणि प्रतिवादी पक्षांत एकापेक्षा जास्त इसम असतील तर त्या प्रत्येकानें आपापला स्वतंत्र लवाद नेमण्यास कांहीं हरकत नाहीं. वादी पक्षांतील सर्व इसमांनीं एकच आणि प्रतिवादी पक्षांतील सर्व इसमांनीं एकच असा लवाद आपआपसांत विचार करून नेमावा. परंतु तें शक्य झालें नाहीं तर त्या त्या पक्षांतील वेगवेगळ्या इसमांस आपापला वेगवेगळा लवाद नेमण्यास कांहीं कायदेशीर हरकत आहे असें मानतां येणार नाहीं. याबाबत न्यायदानमंडळानें जो निकाल दिला आहे तो वाचकांनीं अवश्य वाचून पाहावा. त्या निकालांतील आमचे दृष्टीनें महत्त्वाचा असलेला भाग आम्ही या खालीं देत आहों. हा निकाल न्यायदानमंडळानें दिनांक १० मार्च १९५५ रोजीं नाशिक मुक्कामीं रिव्हिजन ॲपलिकेशन नं. २५ व २८ या कामीं दिला आहे. हे रिव्हिजन ॲप्लिकेशन ज्या मूळ दाव्या-वरून करण्यांत आले त्या मूळ दाव्यांत वादीपक्षाकडे एक इसम व प्रतिवादी पक्षाकडे एकापेक्षां जास्त इसम होते. प्रतिवादीं पक्षांतील ( प्रमुख प्रतिवादीनें ) principal party नें आपला लवाद बोर्डावर नेमला होता. परंतु त्या पक्षांतील दुसऱ्या एका इसमास ( ज्यानें हे रिव्हिजन ॲप्लिकेशन केले होते ) स्वतंत्र असा लवाद सदर बोर्डावर कानू ३२ अन्वयें आपल्यातर्फे नेमण्याचा हक्क राहिला नसल्यानें, असा लवाद नेमण्याची त्याची इच्छा असूनहि, त्याला तसें करण्यास बंदी झाली; व या कारणास्तव त्यानें हें रिव्हिजन ॲप्लिकेशन केलें होतें.

आपेल्या निकालपत्रकाच्या परिच्छेद तीनमध्यें माननीय न्यायदानमंडळ पुढीलप्रमाणें म्हणत आहे. हा निकाल न्याय-दानमंडळाच्या तीनहि सदस्यांनी एक मतानें दिलेला आहे :—

3. " Although the proceedings in this case are in pursuance of Rule 32 the fact remains that even according to the assumed decision of the Regis trar only one of the parties was allowed to nominate his arbitrator as the principal party, the other parties having no opportunity to appoint their arbitrator. The result is that even in theory they go unrepresented in the matter of arbitration. They have had in fact no opportunity to nominate their arbitrator in the arbitration proceedings. But Section 54 of the Bombay Co-operative Societies Act requires that each of the two parties to the dispute should nominate an arbitrator. From this it appears that the intention of the legislature was that if there are more defendants than one, in any particular case, they should all jointly nominate their arbitrator. If in any case, the defendants or plaintiffs, ( whe re they are more than one ), do not agree on a common arbitrator, the question arises as to how all of them

should appoint one arbitrator. It appears that Rule 32 has been specifically framed to solve this question. In doing so, only one of the defendants or plaintiffs among the parties is given the right to nominate an arbitrator as a principal party. Although the Registrar is given the power to decide who the principal party is, his decision will give the right of nomination to one of the defendants only, with the result that the other defendant or defendants will be denied the right to nominate his or their arbitrators. This is contrary to the intention of the legislature as laid down in Section 54. The provisions of Rule 32 are thus contrary to those of Section 54. It will have to be held that Rule 32 is *ultra vires* in so far as this point is concerned. It has been so decided by this Tribunal in Revision Application No. 76 of 1954 on 11th November, 1954."

वरील निकालासंबंधीं कोणतीहि टीका करण्याचा आमचा मानस नाहीं व तसा आम्हांस अधिकारहि नाहीं. आम्हांस न्यायदानमंडळासंबंधीं पूर्ण आदर आहे. तथापि या निकालामुळें सहकारी सोसायटयांच्या कारभारावर काय परिणाम होण्याचा संभव आहे व तो तसा होऊं नये असें सरकारला वाटत असल्यास या बाबतींत काय तजवीज केली जाणें जरूर आहे याचा सरकारनें शक्य तितक्या लवकर विचार करावा, म्हणूनच याबाबत आम्ही आमचे कांहीं विचार यापुढें देण्याचें योजलें आहे.

कायद्याचें कलम ५४ व कानू ३२ यांत "Party", "Person" "Side", व "Principal party" असें शब्द आले आहेत. या शब्दांची स्पष्टपणें व्याख्या सहकारी कायद्यांत केल्याचें दिसत नाहीं. आम्हांस असें वाटतें कीं "Party" व "Side" हे समानार्थी शब्द असून त्यांचा अर्थ "पक्ष" म्हणजे वादीपक्ष किंवा प्रतिवादी पक्ष असा असावा. कोणत्याहि पक्षांत एकापेक्षा जास्त इसम असले तरी अशा सर्व इसमांचा गट म्हणजे "Party" असा अर्थ असावा. मात्र "Principal Party" या शब्दांत येणारा "Party" हा शब्द याच अर्थाचा आहे असें मानतां येणार नाहीं. "Principal Party" म्हणजे "प्रमुख इसम" असा अर्थ असावा असें वाटतें. वादी पक्षांतील अगर प्रतिवादी पक्षांतील "प्रमुख इसम" म्हणजे "Principal Party from the plaintiff side" किंवा "Principal Party from the defendent side" असा असावा असें आम्हांस वाटतें. "person" याचा अर्थ "व्यक्ति अगर संस्था" एवढाच असावा; मग हा "इसम" म्हणजे "person" वादी पक्षांत असो अगर प्रतिवादी पक्षांत असो. या शब्दांचा काटेकोरपणें उपयोग या कलमांत अगर कानूंत झाला आहे असें वाटत नाहीं, एवढेंच नव्हे तर न्यायदानमंडळाच्या निकालांतील जो भाग वर दिला आहे त्यांतहि "party" हा शब्द "person" बद्दल वापरला असावा असेंच दिसतें. "party" म्हणजे "side" अशा अर्थानें तो सदर मंडळानें योजला आहे असें दिसत नाहीं. असो.

कायद्यांतील कलम ५४ ची शब्दरचना मंजूर करतांना कायदेमंडळाचा काय हेतु होता हें निश्चितपणें त्या मंडळाशिवाय इतरांनीं सांगणें फारच धोक्याचें होईल. वादी पक्षांतील अगर प्रतिवादी पक्षांतील (जेव्हां त्या त्या पक्षांत एकापेक्षा जास्त इसम असतील तेव्हां) सर्वांनीं मिळून प्रत्येक पक्षातर्फे एक एक लवाद बोर्डावर निवडून दिला तर उत्तमच. परंतु त्यांच्यांत एकवाक्यता झाली नाहीं व दोन अथवा अधिक लवादांचीं नांवें बोर्डावर दाखल करण्याची परिस्थिति निर्माण झाली तर मग प्रत्येक इसमास आपला वेगवेगळा लवाद मध्यबोर्डावर नेमून देण्याचा हक्क असला पाहिजे, असा हेतु कायदेमंडळाचा होता किंवा कसें हाच फार मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. असा हेतु होता असें वादासाठीं धरून चाललें तर काय काय अडचणी येतील व त्याचे कोणकोणते परिणाम सहकारी सोसायटयांच्या कारभारावर होतील याचा आतां आपण विचार करूं.

सोसायटी व त्यांचे कर्जदार यांचेमधीलच बहुतेक सर्व वाद असतात. कर्जवसुली व्यतिरिक्त इतर बाबींचे असे वाद अपवादात्मकच असतात. सबब सर्वसामान्य दाव्यामध्यें वादीपक्षांत (plaintiff side) फक्त एकच इसम म्हणजे सोसायटी ही असते व प्रतिवादी पक्षांत (defendants side) कर्जदार व त्याचे दोन अथवा अधिक जामीनदार असे तीन अथवा अधिक इसम असतात हे वाचकांपैकीं बहुतेक सर्वांस माहीत असेलच. हा दावा लवाद-मंडळापुढें चालावा अशी इच्छा कोणाहि संबंधित इसमानें प्रदर्शित केल्यास लवादबोर्ड अस्तित्वांत येईल व त्या बोर्डांत रजिस्ट्रार अगर त्यानें नेमलेला इसम हा त्या बोर्डाचा चेअरमन म्हणून असेल. त्या बोर्डाचे इतर सभासद कमींत कमी दोन व जास्तींत जास्त जितके इसम त्या दाव्यांत नमूद असतील तितके, असू शकतील. म्हणजे चेअरमनशिवाय वादीपक्षांतर्फे एक व प्रतिवादी पक्षांतर्फे तीन किंवा त्याहून जास्त इतके सभासद त्या बोर्डावर असूं शकतील. अशाप्रकारें बनलेल्या बोर्डांत प्रतिवादी पक्षातर्फे आलेल्या लवादाचें हुकमी बहुमत असणार हें उघड आहे. अशा बोर्डाचा कल प्रतिवादीपक्षाकडे झुकता राहण्याची शक्यताच जास्त आहे. कारण हे लवाद प्रत्येक इसम आपल्या पसंतीनेंच नेमीत असतो. सर्वसामान्य अनुभव असा आहे कीं, हे लवाद न्यायाधीश ही भूमिका घेण्याऐवजीं ज्या त्या इसमाचा वकील म्हणूनच काम पहातात. अशा परिस्थितींत अशा बोर्डाकडून मिळणारे निवाडे हे वादीपक्षास नुकसानकारकच असण्याची शक्यता अधिक आहे असे आम्हांस तरी वाटतें. असो.

कलम ५४ मंजूर करतांना कायदेमंडळाचा उद्देश वर म्हटल्याप्रमाणें नव्हता अशी परिस्थिति असेल तर प्रस्तुतच्या न्यायदानमंडळाच्या निकालास अनुसरून या कलमांत, तसेंच कानू ३२ ते ३६ यांत, ज्या ज्या दुरुस्त्या कराव्या लागतील त्या जितक्या लवकर करतां येणें शक्य आहे तितक्या लवकर सरकारनें कराव्यात अशी आमची त्यास तातडीची पण फार आग्रहाची विनंती आहे. या कलमांतील व कानूंतील दुरुस्ती करतांना पुढील विचार केले जावेत अशी आमची सूचना आहे:—

(१) सहकारी संस्था व त्यांचे सभासद यांमधील चाललेल्या दाव्यांचीं अपिलें पूर्वीप्रमाणें सरकारनें ऐकून निकाल देणें हें न्यायसत्वर व तडकाफडकी मिळण्याच्या दृष्टीनें सोईचें ठरेल काय? हल्ली ह्या दाव्यांचा अखेरचा निकाल लागण्यास फारच कालावधि लागतो असा अनुभव आहे. हल्लीची कामकाजाची पद्धत व दिवाणी कोर्टाच्या कामकाजाची पद्धत ही जवळजवळ एकाच प्रकारची झालेली आहे, असें म्हटल्यास तें वस्तुस्थितीला सोडून होणार नाहीं. सोसायटयांना न्याय मिळण्यास उशीर लागल्यास त्याचा परिणाम त्यांच्या व्यवहारावर होत असतो, असा आपल्या सर्वांचा अनुभव आहेच.

(२) लवाद बोर्डाची कलम ५४ मध्यें असलेली तजवीज व्यवहाराचे दृष्टीनें निरुपयोगी व कालहरण करणारी आहे, असें

अनुभवाअंतीं सिद्ध झालेलें असल्यानें ती मुळींच रद्द कां करूं नये ? ही योजना बंद केल्यानें कांहींही अडचण येईल असें आम्हांस वाटत नाहीं. दिवाणी कोर्टांत जर एकटाच न्यायाधीश निकाल देतो व तो योग्य असतो असें आपण आजवर समजत आलों आहों, तर मग रजिस्ट्रार अगर त्यानें नेमलेला इसम या एकटयानें दिलेला न्याय योग्य नसेल असें समजण्याचें कांहींही कारण आम्हांस तरी दिसत नाहीं.

( ३ ) लवादबोर्ड ठेवावेंच असा निर्णय सरकारनें घेतला, तर या बोर्डाची रचना अशी असावी कीं त्यामुळें वादीपक्ष व प्रतिवादीपक्ष या दोघांस प्रत्येकीं एक एकच लवाद सदर बोर्डावर पाठविण्याचा हक्क असावा; मग वादीपक्ष अथवा प्रतिवादीपक्ष यांत एकापेक्षा अधिक इसम दाखल असले तरीही त्या पक्षातर्फे एकएकच लवाद सदर बोर्डावर पाठवितां येईल अशी योजना असावी. न्यायदान मंडळ म्हणतें तसा कायदेमंडळाचा उद्देश नाहीं असें त्या कायदेमंडळास ज्यायोगें कळेल व दुसरा कोणताही अर्थ काढण्याची शक्यता राहणार नाहीं अशा दृष्टीनें कलम ५४ व कानू ३२ ते ३६ यांची दुरुस्ती करण्यांत यावी.

---

**दिल्लींतील रस्त्यांवरील अपघात**— १९५४ सालांत दिल्लीच्या रस्त्यांवर झालेल्या अपघातांत ७६ लोक ठार झाले व ६७९ जखमी झाले. मुंबईच्या रस्त्यांवरील अपघातांत १३,७६५ लोक सांपडले व त्यांपैकीं १९६ दगावले. दिल्लींतील अपघातांची संख्या मुंबई व अहमदाबादपेक्षा अधिक आहे असें सुचविण्यांत आलें असतां लोकसभेंत वरील माहिती देण्यांत आली.

**संयुक्त फिनॅन्स कॉर्पोरेशन**— भारतीय सरकारनें दिल्ली राज्य सरकारला असा सल्ला दिला आहे, कीं राज्य सरकारनें पंजाब सरकारशीं सहकार्य करून संयुक्त फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन करावें. सध्यांच्या स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आल्यावरच अशा प्रकारची संयुक्त संस्था स्थापन करतां येईल.

**मुंबई सरकारला विनंति**—जळगांवच्या म्युनिसिपालिटीनें शहरासाठीं ड्रेनेजची योजना तयार केली आहे. योजना पूर्ण करण्यासाठीं सुमारें १३,६२,००० रुपये खर्च येईल. ही रक्कम कर्जाच्या रूपानें उभी करण्याची परवानगी म्युनिसिपालिटीनें मुंबई सरकारकडे मागितली आहे. मुंबई सरकारनें योजना मंजूर केली आहे.

**इजिप्त–रशिया व्यापार**—इजिप्तच्या सरकारनें रशिआशीं वस्तूंच्या ऐनजिनसी बदलाचा करार केला आहे. रशिआला तांदूळ आणि कापसाचें सूत पुरवून त्याच्या बदला इजिप्त तेल घेणार आहे. रुमेनिआशींहि असाच करार करण्यांत आला आहे. रशिआला ६०,००० टन तांदूळ देण्यांत येणार असून रूमेनिआला १२,८०,००० पौंड किंमतीचें सूत मिळणार आहे.

**ब्रह्मदेशांतील रबराचा धंदा**—ब्रह्मदेशांतील रबराच्या धंद्याचा विकास करण्यासाठीं जे तद्देशीय अगर परकीय लोक तयार असतील, त्यांना सर्व प्रकारचें साह्य करण्याची तयारी ब्रम्हदेशाच्या सरकारनें दाखविली आहे. रबराच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण ३० वर्षेपर्यंत न करण्याची हमीहि द्यावयास सरकार तयार आहे.

**रशिआनें माहिती पुरविली**—अणुशक्ति निर्माण करण्यासाठीं लागणाऱ्या 'रीॲक्टर' संबंधीं रशिआनें अधिक तांत्रिक तपशील पुरविला आहे. ही माहिती इतर देशांनीं पुरविलेल्या माहितीपेक्षाहि अधिक पुढची आहे, असें समजतें.

### टाटा हैड्रो कंपन्यांच्या विजेच्या दरांत वाढ

टाटा कंपन्यांनीं आपल्या वीज–विक्रीच्या घाऊक दरांत १ नोव्हेंबरपासून २०% वाढ करण्याचें ठरविलें आहे. चोला व ट्रॉम्बे येथें उत्पादन केली जाणारी वीज टाटा कंपन्यांना घ्यावी लागते, पण ती महाग पडते. त्याची भरपाई करण्यासाठीं कंपनी २०% जास्त दरानें वीज विकणार आहे. घाऊक वीज घेऊन किरकोळीनें ती पुरविणाऱ्या कंपन्यांच्या वीज–खरेदीस त्या प्रमाणांत जास्त किंमत पडेल. गिऱ्हाइकांपर्यंत तें लोण पोंचेल, हें उघड आहे. किती प्रमाणांत त्यांचें विजेचें बिल वाढेल, हें लवकरच समजून येईल. टाटा कंपन्यांच्या दरवाढीचें शेअर बाजारानें स्वागत केलें आहे.

### मुंबई सरकारचें नवें कर्ज

मुंबई सरकारच्या ४% डेव्हलपमेंट १९६७ कर्जासाठीं खालील प्रमाणें अर्ज आले:—

| | |
|---|---|
| रोख | ८,२१,५३,००० रु. |
| जुन्या रोख्यांच्या बदली | ४८,३३,००० रु. |
| एकूण | ८,६९,८६,८०० रु. |

जुन्या रोख्यांच्या बदली सर्वांना नवे रोखे मिळतील. ५,००० रु. पर्यंत रोखींचे सर्व अर्ज मंजूर होतील. त्यापेक्षा जास्त रोखींच्या अर्जदारांना मागणीच्या सुमारें ७५% कर्जरोखे मिळतील.

### पोस्टांत चेक्सचा उपयोग

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकांना चेकनें ठेवी स्वीकारण्याचा व चेकनें ठेवी परत घेण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार देणारें बिल राज्यसभेनें मंजूर केलें आहे. तूर्त फक्त मुंबई राज्यांत हा प्रयोग केला जाईल.

### बॉंबे स्टेट कंझ्युमर्स को. सोसायटी लि.

वरील सोसायटीला मुंबई सरकारनें उधारीनें कापड पुरविलें. त्याच्या किंमतीची सोसायटीकडे बरीच बाकी राहिली, म्हणून सोसायटीनें आपल्याजवळील कापड, फर्निचर व मोटारी सरकारला गहाण लावून दिल्या. येणें वसूल होणार नाहीं असें सरकारला वाटलें किंवा सोसायटी लिक्विडेशनमध्यें गेली, तर महाण टाकलेल्या जिनसा विकून टाकण्याचा सरकारला अधिकार आहे. एकूण १६ लक्ष रुपयांचा माल सरकारकडे गहाण आहे. सरकारचें सोसायटीनें देणें ११·५ लक्ष रुपयांवरून ७·५ लक्ष रुपयांवर उतरलें आहे.

### उद्योगविनिमय केंद्रांची व्यवस्था

एम्प्लॉयमेंट एक्सचेंजसची व्यवस्था १ सप्टेंबरपासून राज्य सरकारांकडे सुपूर्त करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. त्याप्रमाणें, ११ एम्प्लॉयमेंट एक्सचेंजेस मुंबई राज्य सरकारच्या व्यवस्थेखालीं येतील.

---

### शेतीच्या उत्पन्नांत वाढ व त्याचे परिणाम

वरील विषयावर 'अर्थ'च्या १७ ऑगस्ट १९५५च्या अंकांत आंकड्यांसह आलेली माहिती फारच उद्बोधक आहे. १९५१ मध्यें ४·७ दशलक्ष टन धान्य आयात करावें लागलें. याकरितां भारत सरकारास धान्याचे किंमतीबद्दल २१६·४ कोटी रुपये व धान्य आणण्याकरितां, बोटींचें भाड्याकरितां ४०·८ कोटी रुपये मिळून एकंदर २५६·५८ कोटी रुपये ( अर्थ ३–९–५२ वरून ) खर्च करावे लागले. वरील वरून देशांतील उत्पन्न वाढीमुळें परदेशीं जाणारा अफाट पैसा कसा वांचवितां येतो हें स्पष्ट होतें.

वा. कृ. कोमेकर

## पोस्ट ऑफिसं सेव्हिंग्ज बँकांचे व्यवहार ( १९५४ अखेर )

| मार्च अखेर | ठेवीदारांची संख्या (हजार) | पैसे ठेवले (लक्ष रु.) | पैसे काढले (लक्ष रु.) | वर्षअखेर शिल्लक (लक्ष रु.) | प्रत्येक ठेवीदाराची सरासरी ठेव (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १९०० | ७८६ | ४,९८ | ४,७७ | ९,६५ | १२२·८ |
| १९०५ | १,०५९ | ७,०५ | ५,९७ | १३,४१ | १२६·६ |
| १९१० | १,३७९ | ७,८२ | ७,१८ | १५,८७ | ११५·१ |
| १९१५ | १,६४४ | १२,१५ | २०,४३ | १४,८९ | ९०·६ |
| १९२० | १,७६० | २०,९४ | १८,४२ | २१,३५ | १२१·३ |
| १९२५ | २,१६४ | २१,२६ | २०,४१ | २५,६४ | ११८·५ |
| १९३० | २,३०५ | ३०,६१ | २७,९७ | ३७,१३ | १६१·१ |
| १९३५ | ३,१०० | ४४,४० | ३८,३३ | ५८,३० | १८८·१ |
| १९४० | ४,५८३ | ४७,४० | ५० ९४ | ७८,३२ | १७०·९ |
| १९४५ | ३,०९५ | ४९,१३ | ३३,०९ | ८०,२२ | २५९·२ |
| १९४६ | ३,५०७ | ८२,६४ | ४७,८१ | ११५,०५ | ३२८·१ |
| १९४७ | ३,९७३ | १०४,३३ | ७७,०३ | १४२,३५ | ३५८ ४ |
| १९४८ | ३,१५३ | ९९,६७ | ८०,८३ | १२८,११ | ४०६·३ |
| १९४९ | ३,४२६ | ९८,१५ | ७७,७७ | १४८,४९ | ४३३·३ |
| १९५० | ३,८०८ | १०१,६६ | ८२,९६ | १६७,१९ | ४३९·१ |
| १९५१ | ४,०९० | ११०,१९ | ९३,८० | १८५,०६ | ४५२·५ |
| १९५२ | ४,४४६ | १२१,३३ | १०८,५५ | १९९,८१ | ४४९·४ |
| १९५३ | ४,८३० | १२४,४९ | १०६,७४ | २१७,६८ | ४५०·७ |
| १९५४ | ५,०७० | १४१,१८ | १२६,९१ | २३१,९५ | ४५७ ५ |

### जामखेड येथील शिक्षणवर्गाचें उद्घाटन

जामखेड येथील सोसायटयांच्या सेक्रेटरींच्या शिक्षणवर्गाचें उद्घाटन ह्या जिल्ह्याचे असि. रजिस्ट्रार श्री. नानासाहेब सूर्यवंशी यांचे हस्तें ता. ७ ऑगस्ट रोजीं झालें. तालुक्यांतील अनेक सोसायटयांचे प्रतिनिधी, गांवांतील कार्यकर्ते व अधिकारी मिळून सुमारें ७५ मंडळी हजर होती.

आरंभीं को. ट्रे. इन्स्पेक्टर श्री. देशमुख यांनीं शिक्षणवर्गासंबंधीं प्रास्तविक माहिती सांगितली. त्यानंतर जिल्हा सहकारी बोर्डाचे चेअरमन श्री. काळे, तेथील ऑ. मॅजिस्ट्रेट श्री. कोठारी व इतर कांहीं वक्त्यांचीं सहकारी शिक्षणाच्या उपयुक्ततेसंबंधीं भाषणें झालीं. अध्यक्ष श्री. नानासाहेब सूर्यवंशी यांनीं सहकारी चळवळीचे उपयुक्ततेसंबंधीं व वाढीसंबंधीं विस्तृत विवेचन केलें, व हजर असलेल्या सेक्रेटरींना त्यांच्या जबाबदारीची पूर्णतया जाणीव दिली, व हा वर्ग उघडल्याचें जाहीर केलें. शेवटीं बोर्डाचे चेअरमन श्री. काळे यांनीं जमलेल्या मंडळींचे आभार मानले.

### दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर नोकरवर्ग को. ऑ. सोसायटी लि., माळीनगर

व्हा. प्रेसिडेंट व चेअरमन : ग. स. कारभारी

सेक्रेटरी : ना. ग. अंतरकर

वरील सोसायटीस अहवालाचे वर्षी एकूण नफा १६४९ रु. झाला. शेअरवर ५% डिव्हिडंड देण्यांत आलें. सोसायटीचें शेअर भांडवल १८,०५० रु. व एकूण खेळतें भांडवल ५२,९७१ रु. आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. वा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
अ. मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) — श्री. ह. ब. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.